
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 FEB 2020
तरुण भारत

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र शासनाने 'लोकसाहित्य: उत्सव मराठीचा' ही संकल्पना देऊन लोकसाहित्याशी निगडित कार्यक्रमाचे आवाहन केले आहे. त्यानुसार विद्यापीठामध्ये बुधवार (२६) व गुरुवार (२७) रोजी वि. स. खांडेकर सभागृहामध्ये दोन दिवस कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते तर प्र-कुलगुरू प्रा.डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत होणार आहे.



बुधवार (२६) रोजी दुपारी १२ वाजता लोककला महोत्सव होणार आहे. जात्यावरील ओव्या (सावित्रीबाई लोककला पथक, धंदवडे), धनगरी ओव्या (बिरदेव भैरुसिद्ध ओवीकार मंडळ, कुरळप), गजनृत्य (बिरोब गजनृत्य वागूल मंडळ, आरेवाडी), गणगवळण (शाहीर सुरेश कांडगावकर आणि सहकारी), लावणी आणि बैठकीची लावणी (सुनीता कांडगावकर आणि सहकारी), भेदिक शाहिरी (शाहिर हिंदुराव पाटील आणि सहकारी), राष्ट्री शाहिरी (शाहिर रंगराव पाटील आणि सहकारी), झिम्मा फुगडी (जिजाऊ लोककला व लेझीम पथक, धुंदवडे), पोतराज (अंकुश कसबे), वासुदेव (रणवीर वासुदेव) हे कलाप्रकार सादर होणार आहेत. तर 'उत्सव माय मराठीचा' हा मराठी लोकगीतांचा सांगितिक कार्यक्रम आणि 'रेडिसो बटाटा' ही लघुनाटिका संगीत व नाट्यशास्त्र विभागामार्फत सादर केली जाणार आहे.

# लोकसाहित्य उत्सव

कोल्हापूर : मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागात 'लोकसाहित्य : उत्सव मराठीचा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. बुधवारी (ता. २६) दुपारी १२ वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार आहे. या कार्यक्रमात कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील लोककलाकारांचे संघ सहभागी होणार आहेत. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने गुरुवारी (ता. २७) दुपारी १२ वाजता 'उत्सव माय मराठीचा' हा मराठी लोकगीतांचा कार्यक्रम व 'रेडिओ बयाय' ही लघुनाटिका सादर केली जाणार आहे. दोन्ही कार्यक्रम भाषा भवनमध्ये होणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

# विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त लोककला महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ मराठी विभागामार्फत दि. २६, २७ फेब्रुवारी रोजी वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृह येथे लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २६ रोजी दुपारी बारा वाजता लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्‌घाटन कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. दि. २७ रोजी 'उत्सव माय मराठीचा' हा मराठी लोकगीतांचा सांगीतिक कार्यक्रम व 'रेडिओ बटाटा' ही लघुनाटिका संगीत व नाट्यशास्त्र विभागामार्फत सादर केली जाणार आहे.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त लोककला महोत्सव

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दरवर्षी शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे नावीन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यात येतात. यंदा महाराष्ट्र शासनाने 'लोकसाहित्य : उत्सव मराठीचा' ही संकल्पना देऊन लोकसाहित्याशी निगडित कार्यक्रम करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार विद्यापीठाने बुधवारी (ता.२६) व गुरुवार (ता.२७) रोजी कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

२६ ला दुपारी १२ वाजता लोककला महोत्सव होईल. जात्यावरील ओव्या (सावित्रीबाई लोककला पथक, धंदवडे), धनगरी ओव्या (बिरदेव भैरुसिद्ध ओवीकार मंडळ, कुरळप), गजनृत्य (बिरोब गजनृत्य वागूल मंडळ, आरेवाडी), गणगवळण (शाहीर सुरेश कांडगावकर आणि सहकारी), लावणी आणि बैठकीची लावणी (सुनीता कांडगावकर आणि सहकारी), भेदिक शाहिरी (शाहिर हिंदुराव पाटील आणि सहकारी), राष्ट्री शाहिरी (शाहीर रंगराव पाटील आणि सहकारी), झिम्मा फुगडी (जिजाऊ लोककला व लेझीम पथक, धुंदवडे), पोतराज (अंकुश कसबे), वासुदेव (रणवीर वासुदेव) कलाप्रकार सादर केले जातील. २७ ला 'उत्सव माय मराठीचा' हा मराठी लोकगीतांचा सांगितिक कार्यक्रम आणि 'रेडिसो बटाटा' ही लघुनाटिका शिवाजी विद्यापीठाच्या संगीत आणि नाट्यशास्त्र विभागातर्फे सादर केली जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते उद्‌घाटन होईल.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित राहतील. दोन्ही कार्यक्रम विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर सभागृहात होतील. कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य प्रेरणादायी

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यवस्थापन कौशल्य हे तत्कालीन परिस्थितीप्रमाणेच आजही प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

रायरेश्वर (जि. सातारा) येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आय. एफ. पैलवान होते. शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीबद्दल बोलताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वगुणांचा अभ्यास करून स्वतःच्या जीवनात कसा बदल करावा, याविषयी तरुणांनी विचार करणे गरजेचे आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, वयाच्या सोळाव्या वर्षी शिवरायांनी स्वराज्याची शपथ घेतली. त्यांनी केलेला संकल्प सत्यात उतरवला.



**रायरेश्वर : येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. डी. के. गायकवाड आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

आजची पिढी सोळाव्या वर्षी काय करते आहे, याचा अंतर्मुख होऊन विचार करण्याची आवश्यकता आहे.

तत्पूर्वी, गडावर पोहोचल्यानंतर स्वयंसेवकांनी केलेल्या रस्त्याचे कुलगुरूंनी ग्रामस्थांसोबत उद्घाटन केले. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व मान्यवरांनी बैलगाडीने प्रवास केला. यावेळी माजी बी.सी.यू.डी. संचालक प्राचार्य डी. आर. मोरे, डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. अभय जायभाये, ज्ञानदीप सोसायटीचे अध्यक्ष व्ही. जी. पवार उपस्थित होते.

वाई येथील किसन वीर महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने पाचदिवसीय शिव परिक्रमा गड-कोट-किल्ले संवर्धन उपक्रम राबविण्यात आला. शिबिराचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी जनता शिक्षण संस्थेचे संचालक सुरेश यादव उपस्थित होते. यात २०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. शिबिराचा समारोप जनता शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रा. नारायण चौधरी यांच्या हस्ते झाला. शिबिराच्या यशस्वितेसाठी किसन वीर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. आनंद घोरपडे, डॉ. राजेश गावित यांनी परिश्रम घेतले.

## कार्निव्हल महोत्सव : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे आयोजन

# रशियन, जर्मन, जपानी संस्कृतीचे दर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** रशियन, जर्मन, जपानी आणि पोर्तुगाल संस्कृतीचे दर्शन शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित 'कार्निव्हल' या कला, सांस्कृतिक महोत्सवात सोमवारी घडले. 'कार्निव्हल' पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली.

विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनमधील कार्निव्हलचे उद्घाटन चित्रकार संपत नायकवाडी यांच्या हस्ते झाले. यावेळी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, स्नेहा वझे, स्नेहल शेटे, शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर, ऐश्वर्या चव्हाण, आदी उपस्थित होते. या उद्घाटनापूर्वी झालेल्या ओरिगामी कार्यशाळेमध्ये चित्रकार अर्चना देसाई यांनी ओरिगामी प्रात्यक्षिके सादर केली. लीलीची फुले, गांधी टोपी, बाऊल, आदी कागदी कलावस्तू बनविण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी रशियन, जपानी, जर्मन, पोर्तुगीज संस्कृतीशी संबंधित कलावस्तू, ओरिगामी कार्यशाळेत निर्मिती केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन मांडले. त्यात जपानची बुलेट ट्रेनची प्रतिकृती, जपानी चित्रे, जर्मनीचे बी.एम.डब्ल्यू, फोक्स व्हॅगन कंपन्यांच्या मोटारींची मॉडेल्स, फुटबॉल, हाम्बुर्ग व बर्लिन शहरांची माहिती, पोतुर्गालमधील सिरॅमिक प्लेटस् व पोर्सिलीन वस्तू, की चेन, फ्रीज मॅग्नेट, स्कार्फ, रशियन संस्कृतीतील समवार (चहाची किटली, भांडे), मत्र्योशका (लाकडी बाहुली), ग्झहेल सिरॅमिक (लाकडी वस्तू), इकोम (फोटो फ्रेम), जुनी नाणी, सणांची माहिती देणारे जुने कॅलेंडर, त्सार टोपी, रशियन रंगचित्रे, साकुरा फुले आणि माउंट फुजीची कलाकृती, शिबोरी प्रकारातील विविध पर्यावरणस्नेही वस्तू, आदींचा समावेश होता.

'ओरिगामी'तून तयार केलेल्या कागदी फुले, फ्रेम लावलेल्या आणि शिन्चेन व जपानी छत्री-पंखा असलेल्या 'सेल्फी पॉईंट'वर विद्यार्थीनींनी सेल्फी टिपून घेतल्या. सायंकाळी 'वजदा' हा अरेबिक चित्रपट दाखविण्यात आला.



नसीर अत्तार




शिवाजी विद्यापीठात सोमवारी विदेशी भाषा विभागातर्फे आयोजित कार्निव्हलमध्ये मांडण्यात आलेल्या वस्तू पाहण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात कार्निव्हलमधील ओरिगामीच्या कलावस्तूंसमवेत विद्यार्थिनींनी आपली छबी टिपून आनंद व्यक्त केला.

### संस्कृतींना जोडणारा दुवा

- विदेशी भाषा, कला आणि संस्कृतीचा परिचय करुन देणारा हा उत्सव विविध संस्कृतींना जोडणारा दुवा आहे. त्यातून दूरदेशीच्या कलानिर्मिती प्रक्रियेच्या आनंदाची प्रचिती येते, असे नायकवाडी यांनी सांगितले.
- परदेशी संस्कृतीचा भाग असणाऱ्या या पारंपरिक विविधरंगी कलावस्तू प्रेक्षकांना एक व्यापक व समावेशक दृष्टी देतात. लोकांच्या जीवनात रंग भरतात, असे मत डॉ. मेघा पानसरे यांनी व्यक्त केले.

"

विविध चार भाषा आणि त्यांच्या प्रांतांच्या संस्कृतीची एकत्रित माहिती या 'कार्निव्हल'मध्ये मिळाली. त्यामुळे या भाषांबाबत आवड निर्माण झाली. नावीन्यपूर्ण संकल्पना विदेशी भाषा विभागाने राबविली आहे.

**- कोमल गुंदेशा, विद्यार्थिनी**

# तंत्रज्ञान अधिविभागामध्ये 'टेक्नोसिस' स्पर्धा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये रसायन अभियांत्रिकी शाखेतर्फे टेक्नोसिस राज्यस्तरीय स्पर्धा झाली. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन झाले. तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी होते.

शिक्षण ही एक निरंतर प्रक्रिया असून जिज्ञासा हे त्याचे मूळ आहे. आंतरशाखीय संशोधन ही काळाची गरज असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान, सामाजिक कार्यात महिलांचे योगदान याबाबतची चित्रफीत दाखविली. श्रीपाल गायकवाड यांनी स्पर्धेची माहिती दिली.

नावीन्यपूर्ण स्टार्टअप कल्पना, औद्योगिक समस्येवरील पर्याय, मुलाखतकौशल्य चाचणी, प्रश्नमंजुषा, केमरेस, स्टारचबॉक स्पर्धा घेण्यात आली. औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयाचे उपसंचालक सुरेश जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचा समारोप झाला. नोकरी देणारे नवउद्योजक घडावेत. विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचण्याची सवय अंगी बाळगावी, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. पी. डी. पाटील यांनी आभार मानले.

तपोजा दिवाण, डी. एम. नांगरे, पी. पी. पाटील, वैशाली मोहिते, शीतल देहनकर, प्रियंका पाटील, मोहिनी साबळे, ए. बी. मडावी आणि द्वितीय, तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेचे संयोजन केले.

# ‘तणावमुक्तीसाठी कला उपयुक्त’

कोल्हापूर : मानवी जीवनातील तणाव दूर करण्यासाठी कला उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन चित्रकार अजय दळवी यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यार्थी विकास कक्ष समन्वयकांसाठी कार्यशाळा झाली. त्यावेळी ते बोलत होते. च्या कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहात कार्यक्रम झाला. प्राचार्य दळवी म्हणाले, ‘कलेचा संबंध आचार, विचार, भावना व निसर्गातील घटकांशी असतो. कला माणसाला जीवनात परिपक्व बनवते. आयुष्यात प्रत्येकजण कोणत्या-ना-कोणत्या प्रकारच्या कलेचा पुरस्कर्ता असतो.’ या वेळी कव्वाली, इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय युवा महोत्सव व राष्ट्रीय युवा महोत्सवात प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा समारोप

कोल्हापूर टाइम्स टीम

महाराष्ट्राला शाहिरीची प्राचीन परंपरा आहे. शाहिरी कला ही मानवी जीवनात रसनिर्मितीचे सामर्थ्य निर्माण करते. प्रबोधनात्मक परंपरेचा वारसा जीवंत ठेवण्यात शाहिरी कलेने मोठे योगदान दिले असून ही कला जोपासाने काळाची गरज असल्याची भावना विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शाहिरी प्रशिक्षण शिबिराच्या सांगता समारंभात त्यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने वि. स. खांडेकर भाषा भवनात समारंभ झाला. कुलसचिव विलास नांदवडेकर व शाहीर राजू राऊत प्रमुख उपस्थित होते. प्रशिक्षणार्थी महेश सोनुले व सहकाऱ्यांनी 'माझी मैना गावाकडं राहिली, माझ्या जीवाची होतीया काहिली', हे गीत सादर केले. यावेळी भेदीक शाहिरी, शिवरायांचा गोंधळ, महाराष्ट्राचे शाहीर आम्ही व जग बदल घालुनी घाव आदी पोवाड्यांचे सादरीकरण झाले. प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

# विद्यापीठात कार्निव्हल महोत्सवास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विदेशी भाषा, कला व संस्कृतीचा परिचय करून देणारा कार्निव्हल हा उत्सव विविध संस्कृतींना जोडणारा दुवा आहे. त्यातून दूर देशीच्या कलानिर्मिती प्रक्रियेच्या आनंदाची प्रचिती देतात, असे प्रतिपादन चित्रकार संपत नायकवडी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागामध्ये 'कार्निव्हल-२०२०' कला-सांस्कृतिक महोत्सवाचा उद्‌घाटन समारंभ सोमवारी झाला. मानव्यशास्त्र व कला विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, चित्रकार अर्चना देसाई, विदेशी भाषा विभागाच्या प्र. विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांची प्रमुख उपस्थिती होती. महोत्सवात रशियन, जर्मन, जपानी व पोर्तुगीज भाषेच्या विद्यार्थ्यांनी त्या त्या देशातील पारंपरिक कला वस्तूंचे प्रदर्शन सादर केले. यात रशियन समवार, मत्र्योश्का बाहुली, स्त्रियांचा पारंपरिक रंगीबेरंगी स्कार्फ, इकोना चित्रे, त्सार टोपी, पारंपरिक लाकडी व काचेच्या वस्तू, तसेच रशियन रंगचित्रे यांची मांडणी करण्यात आली.

जपानी भाषेच्या विभागाने आकर्षक जपानी चित्रे, 'ओरीगामी'चे विविध प्रकार, 'साकुरा' फुले आणि माऊंट फुजीची कलाकृती, बुलेट ट्रेनचे मॉडेल, जपानी घराची व मंदिराची प्रतिकृती, जपानी राहणीमानाबद्दल माहिती देणारे फलक व शिबोरी प्रकारातील विविध पर्यावरण स्नेही वस्तूंचे प्रदर्शन भरविले होते. 'कार्निव्हल' आयोजनात स्नेहल शेटये, स्नेहा वझे, ऐश्वर्या चव्हाण, शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

# विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त लोककला महोत्सव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे दि. २६ आणि २७ फेब्रुवारी रोजी लोककला महोत्सवाचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र शासनाने 'लोकसाहित्य : उत्सव मराठीचा' या संकल्पनेवर लोकसाहित्याशी निगडित कार्यक्रम करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाकडून दोन दिवस भरगच्च कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत दि. २६ रोजी होणार आहे. दुपारी



१२ वाजता जात्यावरील ओव्या (सावित्रीबाई लोककला पथक, धुंदवडे), धनगरी ओव्या (बिरदेव भैरुसिद्ध ओवीकार मंडळ, कुरळप), गजनृत्य (बिरोब गजनृत्य वागूल मंडळ, आरेवाडी), गण गौळण (शाहीर सुरेश कांडगावकर आणि सहकारी), लावणी आणि बैठकीची लावणी (सुनीता कांडगावकर आणि सहकारी), भेदिक शाहिरी (शाहीर हिंदूराव पाटील आणि सहकारी), राष्ट्रीय शाहिरी (शाहीर रंगराव पाटील आणि सहकारी), झिम्मा-फुगडी (जिजाऊ लोककला व लेझीम पथक, धुंदवडे), पोतराज (अंकुश कसबे), वासुदेव (रणवीर वासुदेव) हे कलाप्रकार सादर केले जाणार आहेत.

दि. २७ फेब्रुवारी रोजी 'उत्सव माय मराठीचा' हा मराठी लोकगीतांचा सांगीतिक कार्यक्रम आणि 'रेडिसो बटाटा' ही लघुनाटिका शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागामार्फत सादर केली जाणार आहे, अशी माहिती कुलसचिव विलास नांदवडेकर आणि मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.